उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

ARTHA, Poona 4

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT

Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३१ | पुणें, बुधवार ७ जुलै, १९६५ | अंक १३



(SCG-1 HIN)

# नहीं—
## यह कोई साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुवदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**




## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन : कार्यालय : २५३३७१ कारखाना : ४०८१२

# विविध माहिती

**विजेच्या यंत्रसामग्रीचा कारखाना**—पश्चिम जर्मनी-मधील एका कारखान्याच्या मदतीनें बंगलोरपासून ६ मैलांवर विजेची यंत्रसामग्री निर्माण करणारा एक कारखाना काढण्यांत येणार आहे. त्याच्या उभारणीसाठी ३५ कोटी रुपये भांडवल लागेल. कारखान्यांत जर्मन कारखान्याचें ४७ टक्के व म्हैसूर सरकारचें ३० टक्के भांडवल राहणार आहे. कांहीं भांडवल सार्वजनिक रीत्या उभारण्यांत येणार आहे. कामगारांना व तंत्रज्ञांना शिकविण्यासाठी पश्चिम जर्मनीचे ५० तज्ज्ञ येणार आहेत.

**पीकिंग-रावळपिंडी नवा मार्ग**—कांहीं दिवसांपूर्वी चीनचे पंतप्रधान चौ-एन्-लाय रावळपिंडीला दोन दिवसांची भेट देऊन गेले. ह्यावेळीं त्यांच्या रशिअन विमानानें पाकिस्तानला जाण्याचा नेहमींचा मार्ग स्वीकारला नाहीं. सिकिअँगमधील खोतान येथें थांबून त्यांचें विमान काराकोरम पर्वतावरून उड्डाण करून सरळ रावळपिंडीला गेलें. त्यामुळें त्यांना भारताच्या प्रदेशावरून जाण्याचें कारणच पडलें नाहीं. सध्यां पाकिस्तानचीं विमानें ढाका-कँटन-शांघाय ह्या मार्गानें चीनला जातात. ह्या मार्गावरील १,५०० मैल अंतर भारतीय प्रदेशावरील आहे.

**कुबेराच्या राज्यांतील दारिद्र्य**—धनकनकसंपन्न अमेरिका हा देश कुबेराचा समजला जातो. परंतु ह्या राज्यांत दरमहा १,२५० रुपयांइतके डॉलर्स मिळविणाऱ्या कुटुंबाला जमाखर्चाची तोंडमिळवणी करणें अशक्य होतें. ह्या कसोटीनें पाहिलें तर अमेरिकेच्या लोकसंख्येपैकी एकतृतीयांश लोक गरिबींत मोडतात!

**अणुविज्ञानांतलि चीनची प्रगति**—चीननें स्फोट केलेल्या अणुबाँबपेक्षा १०० पटींनीं अधिक विध्वंसक असा हैड्रोजन बाँब त्याला एक वर्षाच्या अवधींत तयार करता येईल, असा अंदाज अमेरिकन अणुशास्त्रज्ञांनीं केला आहे. अणुबाँबपासून हैड्रोजन बाँबपर्यंतचा पल्ला गांठण्यास अमेरिकेला ७ वर्षे, रशिआला ४ वर्षे आणि ब्रिटनला ५ वर्षे लागलीं होतीं. आतां संबंधित माहिती ग्रंथगत झाल्यामुळें चीनला इतका वेळ लागणार नाहीं असें त्यांचें मत आहे.

**डिझेल तेलावर चालणारी आगगाडी**—हिंदी रेल्वेच्या इतिहासांत डिझेल तेलावर चालणारी पहिली प्रवासी आगगाडी कांहीं दिवसांपूर्वी कलकत्त्याहून सोडण्यांत आली. दूर अंतराचा प्रवास करणारी तेलावर चालणारी ही पहिलीच आगगाडी असून तिला १५ डबे जोडण्यांत आले होते. सामान्यपणें प्रवासी गाड्यांना १२ डबे जोडण्यांत येतात. डिझेल तेलावर धावणाऱ्या रेल्वे एंजिनाची शक्ति अधिक असल्यामुळें तें अधिक वजन खेचूं शकतें. गाडी मद्रासला जाणारी मेल होती.

**रशियन विमानांची चांचणी**—इंडिअन एअर लाइन्स कॉर्पोरेशनच्या विनंतीस अनुसरून रशियन बनावटीचीं "इल्युशिन-१८" हीं विमानें भारताच्या अंतर्गत वाहतुकीसाठी वापरतां येतील काय, ह्यांची चांचणी सध्यां करण्यांत येत आहे. कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांच्या मतानें हीं विमानें भारताच्या वैमानिकांना कांहीं दिवसांच्या सरावानंतर चालवितां येतील. व्हायकाउंट विमानांपेक्षा हीं विमानें अधिक वजन नेऊं शकतात. पण, त्यांचा जळणाचा वापरहि दीडपटीनें अधिक आहे. "इल्युशिन-२८" हीं नवीन विमानें रुपयांचें चलन घेऊन देण्याची तयारीहि रशियानें दाखविली आहे.

**काळा पैसेवाल्यांचें पलायन**—काळा पैसा मिळवून गबर झालेले कांहीं लोक कलकत्त्याहून नेपाळला पळून गेले आहेत. त्यांनीं आपल्याबरोबर रुपयांच्या नोटांचीं पोतींच्या पोतीं नेल्याची वार्ता आहे. नेपाळमध्यें भारतीय चलन कायदेशीर आहे. राज्य सरकारनें पळून गेलेल्या लोकांना पकडण्याचा हुकूम काढला आहे. ह्या लोकांची बंगालमधील मालमत्ता जप्त करण्यांत येण्याचाहि संभव आहे. काळा पैसा 'पांढरा' करण्यासाठी सरकारनें दिलेली सवलत त्यांना अपुरी वाटली.

**आर्थिक आणीबाणीची परिस्थिति**—इजिप्तमधील कापसाच्या पिकावर मोठ्या प्रमाणावर कीड पडल्यानें प्रजासत्ताकाच्या शेतकी खात्यानें आणीबाणीची परिस्थिति जाहीर केली आहे. इजिप्तमधील ३७ हजार एकर जमिनींतील कापसाच्या पिकाला कीडीमुळें धोका उत्पन्न झाला आहे. पीक वाचविण्यासाठी जोराचे प्रयत्न करण्यांत येत आहेत.

**स्कूटरच्या कारखान्यांची प्रगति**—भारतामधलि स्कूटर्स तयार करण्याच्या कारखानदारीनें गेल्या कांहीं वर्षांत लक्षांत भरण्यासारखी प्रगति केली आहे. १९६४ सालीं दोन चाकांच्या ३३,९०१ स्कूटर्सचें आणि तीन चाकांच्या २,४९३ स्कूटर्सचें उत्पादन करण्यांत आलें. १९६५ सालीं लॅंब्रेटा आणि व्हेस्पा ह्या स्कूटर्सचें उत्पादन प्रत्येकी १२ हजारांच्या घरांत जाईल असा अंदाज आहे. स्कूटर्स हें वाहतुकीचें साधन स्वस्त असल्यानें अतिशय लोकप्रिय झालेलें आहे. अर्थात् त्याची मागणीहि वाढत चालली आहे. मागणी भागविण्यासाठी असोसिएशन ऑफ इंडियन ऑटोमोबाइल मॅन्युफॅक्चरर्स जोराचे प्रयत्न करीत आहे. स्कूटर्समध्यें अगदीं थोडे भाग परदेशी बनावटीचे वापरण्यांत येतात; बहुतेक सर्व बांधणी देशांत तयार होणारें साहित्य वापरूनच करण्यांत येतें.

**इजिप्तला रशियाची लष्करी मदत**—रशिआनें इजिप्तला कांहीं मोठ्या वजनाचे रणगाडे पुरविण्याचें कबूल केलें आहे. पश्चिम आशियांतील कोणत्याहि देशाजवळ असलेल्या रणगाड्यांपेक्षा हे रणगाडे भारी असतील आणि त्यामुळें इजिप्तच्या लष्करी सामर्थ्यांत चांगलीच वाढ होईल. इजिप्तजवळ आतां १,५०० लष्करी वाहनें असावीं आणि त्यांतील ७०० चिलखतीं मोटारगाड्या असाव्या, असा अंदाज आहे.

**कामगारांना २४ लाख रुपये बोनस**—भारत सरकारनें काढलेल्या बोनससंबंधीच्या वटहुकुमास अनुसरून हिंदुस्थान मशीन टूल्स कारखान्याच्या चालकांनीं आपल्या ५,८०० कामगारांना मिळून २४ लाख रुपयांचा बोनस देण्याचें जाहीर केलें आहे. प्रत्येक कामगाराला त्याच्या वार्षिक उत्पन्नाच्या २० टक्के बोनस देण्यांत आला. सार्वजनिक मालकीच्या कारखान्यानें बोनस वाटल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे. त्याची रकमाहि सर्वांत अधिक आहे.

**नागार्जुनसागर योजनेचें ओझें**—आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्रि श्री. रेड्डी ह्यांनीं असें जाहीर केलें आहे कीं, नागार्जुनसागर धरणाच्या खर्चाचें ओझें राज्याला झेपण्यासारखें नाहीं. ह्या कामावर आतांपर्यंत १०० कोटी रुपये खर्च झालेले आहेत. मध्यवर्ती सरकारनें हें काम अंगावर घेतलें, तर तें उरलेले ४० कोटी रुपये खर्च करून दोन वर्षांत पुरें होण्यासारखें आहे. राज्य सरकारला मात्र १० वर्षे लागतील.

# अर्थ

बुधवार, ७ जुलै, १९६५





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अर्बन सहकारी बँकांची प्रगति कशी होईल ?

### रिझर्व्ह बँकेच्या नियोजित नियंत्रणाचें स्वरूप

अर्बन सहकारी बँकांची मजबुती आणि उपयुक्तता वाढण्याच्या दृष्टीनें रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, श्री. पी. सी. भट्टाचार्य, ह्यांनीं महाराष्ट्र राज्य सहकारी अर्बन बँकांच्या परिषदेचें उद्घाटन करतांना कांहीं सूचना केल्या. ठेवीवरील व्याजाइतकाच खातेदारांना दिल्या जाणाऱ्या सेवेचा दर्जा महत्त्वाचा आहे, असें त्यांनीं सांगितलें. कांहीं अर्बन बँकांची कार्यक्षमता अगदीं चांगल्या व्यापारी बँकांच्या कार्यक्षमतेच्या तोडीची असली, तरी बहुसंख्य अर्बन बँकांना अजून बरीच मजल मारावयाची आहे. बँकेची इमारत, तिची आकर्षकता, कचेरीची जागा, तिच्यांतील कौंटर्स, लावलेल्या पाट्या, ह्या सर्व बाबींकडे त्यांनीं अधिक लक्ष पुरविणें अगत्याचें आहे. बँकेचा नोकरवर्ग किती तत्पर, सेवावृत्तीचा आणि माहितगार आहे, ही गोष्ट ठेवीदारांच्या दृष्टीनें अधिकच, निदान तितकी तरी, महत्त्वाची आहे. सध्यांच्या स्पर्धेच्या वातावरणांत सामान्य जनतेच्या बँकिंगच्या सोयी–सवलतींबद्दल अपेक्षा फार वाढल्या आहेत. त्या पुऱ्या पाडण्याच्या दृष्टीनें, नोकरवर्ग अधिक कार्यक्षम आणि नव्या मनूशीं समरस होणारा असणें जरूरीचें आहे. आपल्या नोकरवर्गाला त्या दृष्टीनें शिक्षित आणि जागरूक करण्यासाठी अर्बन बँकांनीं एकत्रित येऊन हालचाल करायला हवी. व्यापारी बँकांच्या नोकरवर्गाच्या शिक्षणाच्या धर्तीवर सहकारी बँकांच्या नोकरवर्गाच्या शिक्षणाची व्यवस्था रिझर्व्ह बँकेनेंच हातीं घेणें कितपत युक्त होईल, ह्याचा विचार ती बँक करीत आहे.

व्यापारी बँकांना डिपॉझिट इन्शुअरन्स योजनेचा फायदा मिळतो तसा सहकारी बँकांना मिळत नाहीं; त्या बँका ठेवींच्या विमायोजनेच्या कक्षेंत आलेल्या नाहींत. अर्बन बँकांवर ह्याचा विशेषच परिणाम होतो. शहरांतील व्यापारी बँकांची स्पर्धा त्यांना जाणवते; आणि मध्यवर्ती सहकारी बँकांना ग्रामीण भागांतून ठेवी मिळविता येतात, तो मार्गहि अर्बन बँकांना उपलब्ध नाहीं. ठेवींची विमायोजना शक्य तितक्या लवकर सहकारी बँकांना लागू करावी, असा निर्णय रिझर्व्ह बँकेनें आणि भारत सरकारनें घेतला आहे. तो प्रत्यक्ष कृतींत येण्यास एका गोष्टीची आवश्यकता आहे आणि ती म्हणजे रिझर्व्ह बँकेला सहकारी बँकांच्या व्यवहारावर नियंत्रणाचा अधिकार असायला हवा. कोणत्याहि मध्यवर्ती कायद्याला सहकारी बँकांना बँकिंग कंपन्यांच्या बरोबरीनें बसवितां येणार नाहीं; राज्य सरकारांना आपापले सहकारी सोसायट्यांचे कायदे बदलून रिझर्व्ह बँकेला ते अधिकार द्यावे लागतील. घटनेप्रमाणे मध्यवर्ती सरकारला तें करतां येणार नाहीं. रिझर्व्ह बँकेला अशा रीतीनें दिले जाणारे अधिकार घर्षण टाळून वापरले जातील, ह्यासाठी राज्य सरकारें आणि रिझर्व्ह बँक ह्यांचेमध्यें विचारविनिमय होत राहील, अशी परंपरा निर्माण करणें सहज शक्य आहे. राज्य सरकारांनीं ह्या सर्व योजनेस मान्यता दिली म्हणजे डिपॉझिट इन्शुअरन्सच्या योजनेचे फायदे सहकारी बँकांना मिळण्याच्या मार्गांतील सर्व अडचणी दूर होतील. सहकारी चळवळीच्या पुढाऱ्यांनीं राज्य सरकारांना जरूर ती कायद्याची योजना सत्वर करण्यास उद्युक्त करायला हवे.

सहकारी बँकांच्या बँकिंगच्या व्यवसायावर नियंत्रण घालणारा कायदा पार्लमेंटांत आणलेला आहे. त्याचा परिणाम अर्बन बँकांची स्पर्धेला तोंड देण्याची शक्ति सुधारण्यांत निःसंशय होईल. हा कायदा मंजूर झाल्यावर रिझर्व्ह बँकेचें नियंत्रण येईल आणि तें इष्ट व आवश्यक आहे. कारण, सहकारी बँकिंगचा व्याप आतां इतका वाढला आहे कीं तो भाग नियंत्रण–कक्षेबाहेर राहिल्यानें आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण राखण्याचें आपलें काम रिझर्व्ह बँकेला नीट पार पाडतां येणार नाहीं. देशाच्या नियोजित विकासाला आवश्यक अशीं धोरणें आखून तीं पार पाडण्याचें काम रिझर्व्ह बँकेला करावयाचें असतें. नियंत्रणांचा उद्देश, व्यापारी व सहकारी बँकांना आपआपली भूमिका नीट पार पाडतां यावी, हाच आहे. दोष राहणे, धोरण आखण्यांत चूक करणें, पैशाचा उपयोग योग्य न करणें, कारभारांत गैरव्यवस्था असणें, इत्यादि टाळावयाचें असतील तर नियंत्रण अपरिहार्यच आहे. आपल्या हितसंबंधांचें रक्षण रिझर्व्ह बँक जागरूकतेनें करीत आहे, ह्या जाणिवेमुळें जनतेचा व्यापारी बँकांवरील विश्वास वाढला आहे, ही सत्यस्थिति आहे. हीच गोष्ट सहकारी बँकांच्या बाबतींतहि घडून येईल आणि त्यामुळें त्या बँकांकडील ठेवींत भर पडेल. सहकारी क्षेत्रांत रिझर्व्ह बँक प्रथमच पाऊल टाकीत आहे. तेव्हां ती दक्षतेनें, विचारपूर्वक, सर्व कांहीं करील हें निःसंशय.

रिझर्व्ह बँक सहकारी बँकांचे फक्त बँकिंगचे व्यवहार नियंत्रित करील; त्यांची घटना, कारभार, व्यवस्थापन, इत्यादि बाबतींत सहकारी खात्याच्या रजिस्ट्रारांचाच अधिकार पूर्ववत चालेल. रिझर्व्ह बँकेकडे आतां जे अधिकार दिले जातील त्यांचा वापर करतांना राज्य सरकार, रजिस्ट्रार आणि संबंधित सहकारी बँक ह्यांना विश्वासांत घेऊनच केला जाईल. ह्या बाबतींत उपकारक परंपरा निर्माण करणें अवघड नाहीं. रिझर्व्ह बँक आणि राज्य सरकार ह्या दोघांच्या दुहेरी नियंत्रणामुळें सहकारी बँकांना भासणाऱ्या अडचणींचा फार बाऊ करण्याचें कारण नाहीं.

नव्या कायद्याप्रमाणें, प्राथमिक सहकारी बँका ह्या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या संस्थांना सवलतीच्या व्याजाच्या दरानें रिझर्व्ह बँकेकडून आर्थिक मदत मिळण्याची रिझर्व्ह बँक कायद्यांत तरतूद करण्यांत यावी, अशी सहकारी अर्बन बँकांची सूचना आहे. कांहीं विशिष्ट कारणांकरितां सवलतीच्या दरानें रिझर्व्ह बँक कर्जपुरवठा करते. पण तो कोणत्याहि कायदेशीर तरतुदीचा परिणाम नसून वेळोवेळ रिझर्व्ह बँकेनें धोरणाबाबत घेतलेल्या निर्णयांचा परिपाक आहे. शेतकीचें उत्पादन वाढविण्याचा एक प्रभावी मार्ग ह्या दृष्टीनें शेतकी पतपुरवठा वाढविण्याचें ठरविण्यांत आलें. अर्बन बँकांची परिस्थिति वेगळी आहे. ह्या संस्था स्वयंपूर्ण असाव्यात अशीच अपेक्षा आहे. जरूर पडली तर वरिष्ठ बँक आणि केंद्रीय बँक, आणि अगदीं विशेष गरजेच्या वेळीं रिझर्व्ह बँकहि मदतीला येईल. पण मुख्य भर स्वावलंबनावर आहे, आणि तसाच तो पुढें राहणें युक्त आहे. शेतकी पतपेढ्यांचा दाखला येथें गैरलागू आहे.

## भारतांतील जाहिरातींच्या धंद्यांत परदेशी फर्म्सचें प्रस्थ

भारतांत दरसाल सुमारें ३० कोटी रुपये जाहिरातींवर खर्च केले जातात. त्याच्या एकतृतीयांश, म्हणजे १० कोटी रु. च्या जाहिराती सरकारच्या द्वारां दिल्या जातात. ४०%, म्हणजे १२ कोटी रु. च्या जाहिरातींची व्यवस्था परदेशी मालकीच्या फर्म्सचेद्वारां होते, आणि १८% म्हणजे ५४० लक्ष रुपयांच्या जाहिरातींचें वितरण सुमारें २०० लहान-मध्यम, बऱ्या-वाईट, हिंदी फर्म्सच्या द्वारां होतें. जाहिरातीच्या धंद्यांत विदेशी फर्म्सचें प्रभुत्व असण्याचें कारण, विदेशी कंपन्यांचें काम त्यांना मिळतें. त्यांच्या कामाचा दर्जा उच्च असतो, हें अर्थातच खरें आहे. कांहीं मोठ्या हिंदी कंपन्याहि विदेशी फर्मकडे जाहिरातीचें काम सोंपवितात. एअर इंडियाचें खातें एका विदेशी जाहिरातदार फर्मकडेच आहे!

अशा परिस्थितींत हिंदी जाहिरातदार फर्म्सना धंदा करणें कठीण जात आहे. कांहींना उद्योगसमूहांचें पाठबळ मिळून त्यांचा संसार सुखानें चालतो, तर कांहींना कमिशनवर रीबेट देऊन धंदा टिकवावा लागतो. हिंदी जाहिरातदार फर्म्स जगाच्या २० ते ३० वर्षें पाठीमागें आहेत, असें म्हणतात. बाजारपेठेची पाहाणी करणें, जाहिरातीचे परिणाम तपासून पाहणें, गिन्हाईक कशानें किती उद्युक्त होतात ह्यांचें संशोधन करणें, इत्यादि बाबतींत हिंदी फर्म्सना खूपच वाटचाल करावयाची आहे. परदेशांत निर्गतीसाठी अनुकूल वातावरण अजमावण्याचें काम पार पाडण्यास त्या समर्थ नसल्यानें, एखाद्या विदेशी फर्मच्या भागीदारींत त्यांना तें काम करावें लागतें. खुद्द भारत सरकारहि अशा पाहण्यासाठीं व कामासाठी विदेशी फर्म्सची मदत घेते. अशा परिस्थितींत, कांहीं फर्म्सनीं परदेशी फर्म्सशीं कोलॅबोरेशन करण्याचा प्रयत्न करणें स्वाभाविक आहे. ४९% विदेशी भागीदारीच्या अटीवर एका फर्मला अशी मंजुरी सरकारनें दिली आहे, तर दुसऱ्या एका फर्मला २५% विदेशी भागीदारीच्या अटीवर मंजुरी मिळाली आहे. हिंदी जाहिरातदार फर्म्सनीं ह्याविरुद्ध सरकारकडे तक्रार केली आहे. त्यांत ज्यांचे अर्ज नाकारले होते, अशाहि फर्म्स आहेत.

---

### रशियांतील मालमत्तेची ताळेबंदांतील नोंद

नॉर्थ कॉकेशस ऑइल फील्ड्स लि. ह्या लंडन येथें मुख्य कचेरी असलेल्या कंपनीनें, तिच्या रशिआंतील मालमत्तेचें रशिआनें राष्ट्रीयीकरण केलें आहे, ह्याची अजून दखल घेतलेली नाहीं! कंपनीच्या ताळेबंदांत "रशिआंतील मालमत्ता–८९५.२२४ पौंड" अशी रकम जिंदगीच्या बाजूस दरसाल दाखविण्यांत येत आहे. "कंपनीच्या रशिआंतील मालमत्तेच्या किमतीबद्दल आम्ही मत प्रदर्शित करूं शकत नाहीं" असें सर्टिफिकेट चार्टर्ड अकौंटंट ३०० रु. घेऊन दरसाल देत असतो!

---

### टेलिफोन मिळण्यासाठी ३,००,००० अर्जदार वाट पाहात आहेत

भारतांत तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेर ८,००,००० टेलिफोन बसविलेले असतील, आणि ३,००,००० लोकांचे अर्ज वाट पाहात बसलेले असतील. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर टेलिफोन्सची संख्या सहा पट झाली तरी शिलकी अर्जांची संख्याहि सहापट झाली. टेलिफोन मिळायला वेळ लागतो, त्यामुळें पुष्कळ जण अर्जच करीत नाहींत. खरी मागणी शिलकी अर्जापेक्षा खूपच मोठी आहे.

---

### आयात अवघड करण्यासाठी रिझर्व्ह बँकेचें नवें बंधन

आयातीवरील बंधनें वाढविण्याच्या दृष्टीनें रिझर्व्ह बँकेनें एक नोटिफिकेशन काढलें आहे. प्रत्येक आयातदारानें ह्यापुढें आपल्या आयातीच्या प्रत्येक शिपमेंटच्या किमतीच्या २५% एवढी रक्कम परदेशी हुंडणावळीचा धंदा करण्याचा अधिकार असलेल्या बँकेंत अनामत ठेवली पाहिजे. लायसेन्समधील मालाची रक्कम ५,००० रु. वर असेल, तर त्याला हा नियम लागूं होईल. संबंधित शिपमेंटच्या किमतीचा बटवडा झाला म्हणजे, किंवा अनामत ठेवल्यापासून दोन महिन्यांनीं अथवा रिझर्व्ह बँकेनें मागितलेलें कागदपत्र सादर केल्यानंतर आयातदाराला त्याची अनामत रकम परत मिळेल. अशा ठेवीच्या तारणावर आयातदारांना कर्ज न देण्याबद्दल बँकांना बजावण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणें, आयातदारांना दिलेल्या बिनतारणी कर्जांत वाढ करतां कामा नये.

रिझर्व्ह बँकेच्या ह्या कारवाईबद्दल मुंबईच्या व्यापारी वर्गानें चिंता व्यक्त केली आहे. आयातीवरील हें नवें बंधन उद्योगधंद्यांच्या अडचणींत भरच घालणारें आहे, असें मत इंडियन मर्चंट्स चेंबरच्या अध्यक्षांनीं व्यक्त केलें आहे. आयातदारांनीं ठेवलेल्या रकमा संबंधित बँकांनीं सरकारी ट्रेझरी बिलांत गुंतविल्या पाहिजेत, ह्या अटीचा हेतु उद्योगधंद्यांना आवश्यक असलेला पैसा स्वतःच्या गरजांकडे वळविण्याचा दिसतो; हिंदी आयातीवर इतकीं कडक बंधनें अगोदरच असतांना हें नवें बंधन असमर्थनीय आहे, असें ते म्हणाले.

---

### परदेशीय मदतीमुळें प्रश्न सुटणार नाहीं.

फेडरेशन ऑफ चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ह्या संघटनेपुढें बोलतांना नियोजन समितीचे उपाध्यक्ष श्री. अशोक मेहता म्हणाले, कीं जगाच्या लोकसंख्येपैकी भारताची लोकसंख्या एकसप्तमांश आहे. इतक्या लोकांना मदत करण्याची आणि खाऊ घालण्याची जबाबदारी स्वीकारण्याची आंतरराष्ट्रीय द्रव्यविषयक संघटना व इतर देश ह्यांची तयारी नाहीं. भारताचें पोट भरावें म्हणून अमेरिकेनें गहू पुरवून स्वतःच्या प्रजाजनांवर कर बसवावा अशी अपेक्षा करणें चुकीचें आहे. चीनला रशिया मदत करीत होता पण पुढें ही मदत बंद झाल्यावर चीननें आपली अर्थव्यवस्था नवेनवे मार्ग काढून सुधारली. भारतामधील उद्योगपतींनीं असे नवीन मार्ग शोधले पाहिजेत. उद्योगपतींनीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं निर्यातींत सुधारणा झाल्याखेरीज आयात करणें शक्य होणार नाहीं. निर्यातींत झालेल्या घसरगुंडीमुळेंच सध्यांची परदेशीय चलनाची टंचाई उद्भवली आहे.

---

### आग्नेय आशियाचा आर्थिक विकास

आग्नेय आशियांतील मागासलेल्या देशांचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठीं अनेक देशांनीं मिळून एक विकासनिधि उभारावा अशी सूचना मि. युजीन ब्लॅक ह्यांनीं केली आहे. ह्या मार्गांतील विकासकार्याची कल्पना येण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष मि. जॉन्सन ह्यांनीं त्यांना आपला खास प्रतिनिधि म्हणून धाडलें आहे. ह्याविषयीं बँकॉक येथें बोलतांना ते म्हणाले, कीं अमेरिका ह्या कामासाठी १० कोटी डॉलर्सची मदत देण्यास तयार आहे. कांहीं महिन्यांपूर्वी प्रे. जॉन्सन ह्यांनीं आशियांतील देशांच्या आर्थिक विकासासाठी १०० कोटी डॉलर्स खर्च येणारी योजना सुचविली होती व ह्या योजनेंत रशियानेंहि भाग घ्यावा अशी विनंती केली होती. आतां अमेरिकेनें देऊं केलेली मदत वरील कार्यक्रमाबाहेरची आहे, असा खुलासाहि मि. ब्लॅक ह्यांनीं केला.

**बोकारो कारखान्यासंबंधींचा अहवाल**—बोकारो येथें रशिआच्या मदतीनें उभारण्यांत यावयाच्या पोलादाच्या कारखान्यासंबंधीचा अहवाल रशिअन एंजिनिअर्स, नोव्हेंबरमध्यें सादर करतील अशी अपेक्षा आहे. कारखान्याबाबत दस्तुर आणि कंपनीनें जो अहवाल तयार केला होता त्याच्या प्रती रशिअन एंजिनिअर्सना देण्यांत आल्या आहेत. कारखान्यासाठी लागणाऱ्या ३६ हजार एकर जमिनींपैकी १२ हजार एकर जमिनीचा ताबा बिहार सरकारनें मिळविला आहे. कारखाना उभारणीचें काम करणाऱ्यासाठी घरें बांधण्याचें काम जोरात चालूं आहे. आतांपर्यंत १,२०० राहण्याच्या जागा बांधून झाल्या आहेत.

**कर्ज मिळविण्याची खटपट**—जागतिक बँकेकडून १० कोटी डॉलर्सचें कर्ज मिळविण्याचा प्रयत्न भारत सरकार करीत आहे. मोटारी, यांत्रिक हत्यारें, विजेचीं उपकरणें, इत्यादींचें उत्पादन चालू ठेवण्यासाठीं कर्जाचा उपयोग करण्यांत येणार आहे. कर्जाच्या वाटाघाटी करण्यासाठी सरकारी प्रतिनिधींचें मंडळ लवकरच अमेरिकेला जाणार आहे. ह्याच धंद्यासाठी गेल्या सालीं ३ कोटी डॉलर्सचें कर्ज मिळविण्यात आलें होतें. परंतु तें अपुरें पडलें. हें कर्ज मिळालें तर संबंधित उद्योगधंद्यांवर होणारा परदेशी चलनाच्या टंचाईचा परिणाम फारसा जाणवणार नाहीं.

**नेवेली कारखान्यासाठी कर्ज**—नेवेली येथील कोळशाच्या खाणींचा विस्तार करण्यासाठी पश्चिम जर्मनीचें सरकार आणि भारत ह्यांच्या दरम्यान करार करण्यांत आला आहे. करारांतील शर्तीस अनुसरून जर्मनी भारताला १२ कोटी रुपयांचें कर्ज देणार आहे. कर्जावर ३ टक्के व्याज आकारण्यांत येणार असून त्याची फेड २५ वर्षांच्या अवधींत करावयाची आहे.

**कापडाच्या धंद्यासाठीं कॉर्पोरेशन**—कापडाच्या धंद्यासाठी एका कॉर्पोरेशनची स्थापना करण्यांत यावी अशी मागणी राजस्तान सरकारनें नियोजित समितीकडे केली होती. समितीनें मागणी मंजूर केली आहे. राजस्तानसाठी स्थापन करण्यांत यावयाच्या ह्या कॉर्पोरेशनचें भांडवल ५ कोटी रुपये असेल. राज्यांत ह्या वर्षी चालू करण्यांत यावयाच्या दोन सुती कापडाच्या व एक लोकरीच्या कापडाची गिरणी कॉर्पोरेशनतर्फे चालविण्यांत येणार आहेत. ह्या गिरण्यांसाठी परदेशीय यंत्रसामग्री आयात करण्यांत येईल.

**तेलाच्या सहकारी गिरण्या**—गुजरात प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. पटेल ह्यांनीं सूचना केली आहे कीं सौराष्ट्रांतील तेलाच्या गिरण्या सहकारी क्षेत्रांत समाविष्ट करण्यांत याव्या. शेतकऱ्यांनीं आपलें हित लक्षांत घेऊन दुधालयें, साखर कारखाने, कापूस, ह्यांच्याप्रमाणेंच तेलाच्या गिरण्याहि सहकारी तत्त्वावर काढाव्या. पैसे देणारीं पिकें पिकविणारा शेतकरी अजूनही वायदेबाजाराच्या पकडींतून सुटलेला नाहीं, अशी त्यांची तक्रार आहे.

**काळजी वाटण्यासारखी परिस्थिति**—लंडनच्या फायनॅन्शिअल टाइम्स ह्या पत्रानें भारताच्या परदेशीय चलनाच्या टंचाईच्या परिस्थितीसंबंधीं आपल्या कलकत्त्याच्या वार्ताहराकडून आलेलें खास बातमीपत्र छापलें आहे. वार्ताहरानें आपल्या पत्रांत असें म्हटलें आहे कीं, भारताची परदेशी चलनासंबंधीची परिस्थिति गेलीं नऊ वर्षे कमी-अधिक चिंताजनक होतीच. परंतु सध्यां चालू असलेली परिस्थिति अतिशयच बिकट असून तिला तोडच नाहीं. टंचाईचें कारण, भारताला निर्यातीपासून प्राप्त होणारें उत्पन्न प्रमाणाबाहेर घसरलें आहे, हें आहे.


# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
## मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

| : मुख्य कचेरी : | : विभागीय कचेरी : |
| --- | --- |
| ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई | महाल : नागपूर. |
| टेलिफोन नं. २५५४७४-७५, २५६२१४ २५४७८१ | तारेचा पत्ता : फार्मर बँक |

: बृहन्मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैसा शेतकरी, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखरकारखाने यांच्याच उपयोगासाठीं दिला जातो.

| | | |
| --- | --- | --- |
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ५,८०,४३,००० |
| गंगाजळी व फंड | ... | १,४४,७४,००० |
| ठेवी | ... | ३०,९०,२५,००० |
| खेळतें भांडवल | ... | ७९,७७,६७,००० |

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

वा. पु. श्रीश्रीमाळ — मॅनेजर
वि. म. जोगळेकर, — जनरल मॅनेजर



# स्वस्तिकचा माल निर्यात होऊं लागला

—: कांहीं बोलके आंकडे :—

| | |
| --- | --- |
| १९६३ सालांतील मालाची विक्री | रु. २ कोटी, २ लक्ष |
| १९६३ अखेर वसूल भाग-भांडवल | रु. ४३,८१,४८५ |
| कामगारांची संख्या | १,१०० चे वर |
| कारखान्याच्या बांधलेल्या जागेचें क्षेत्रफळ | १,१०,००० चौ. फू. |

— प्रमुख उत्पादनें —

गमबूट्स—होजपाईप्स—प्रेशर होजेस
ग्लोव्हज—इरेझर्स—ऑईल सीलस
व
स्वरूप केबल्स

## स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि.
स्वस्तिक गृह, खडकी, पुणें ३.
( टेलिफोन नं. : ५५२०१ )

## पाकिस्तानांतील हिंदी बँका

### कचेऱ्या बंद कराव्या लागणार

सोळा हिंदी शेड्यूल्ड आणि दोन बिगर–शेड्यूल्ड बँकांच्या ४२ कचेऱ्या पाकिस्तानांत आहेत. त्या सर्व बंद कराव्या लागण्याचा प्रसंग येणार आहे असें दिसतें. १९६२ च्या पाकिस्तानच्या बँकिंग कंपन्यांच्या ऑर्डिनन्सच्या कांहीं तरतुदींबाबत भारत आणि पाकिस्तान ह्यांच्यामध्यें तडजोड होण्यावर त्या बँकांचें भवितव्य अवलंबून आहे. ह्या ऑर्डिनन्सप्रमाणें पाकिस्तानाबाहेर स्थापन झालेल्या सर्व बँकांनीं आपलें सर्व वसूल भांडवल आणि पाकिस्तानांतील ठेवींच्या ५% एवढी रक्कम किंवा २० लक्ष पाक् रु. ह्यांपैकी जी रक्कम जास्त असेल तेवढी रक्कम स्टेट बँक ऑफ पाकिस्तानमध्यें ठेवावयाची आहे. ऑर्डिनन्समधील ही योजना परदेशी बँकांना जाचक आहेच. पण त्याहिपेक्षा, ठरणारी रक्कम संबंधित बँकांनीं पाकिस्तानाबाहेरून आणून ठेवली पाहिजे, ही अट जाचक आहे. १९६२ च्या जूनमध्यें ऑर्डिनन्स काढण्यांत आला. तरी परदेशी बँकांना अट पुरी करण्यासाठी वेळोवेळ मुदत देण्यांत आली. ही मुदतवाढ नुकतीच संपली आहे.

पाकिस्तानी ऑर्डिनन्स सर्वच परदेशी बँकांना लागू आहे, हें खरें; पण हिंदी बँकांवर त्याचा विशेष ताण पडणारा आहे. कारण, पाकिस्तानांतील हिंदी बँकांची संख्याच मोठी आहे. सर्वच्या सर्व १८ हिंदी बँकांनीं आवश्यक ती रक्कम पाकिस्तानच्या स्टेट बँकेंत ठेवावयाची म्हटलें, तर परदेशीय चलनावर भलताच निष्कारण ताण पडेल. पाकिस्तानांतील विदेशी बँकांना स्वतःचे पाकिस्तानामधील नफे बाहेर पाठविता येतात; हिंदी बँकांना ती मुभा नाहीं. हिंदी बँकांनीं गेल्या कित्येक वर्षांत तेथें मिळविलेले नफे तेथेंच राहिलेले आहेत, पण त्यांचा ऑर्डिनन्सच्या अटीच्या पूर्तीसाठी कांहींच उपयोग नाहीं. त्यांनीं भारतांतूनच रकमा आणल्या पाहिजेत ! फाळणीच्या वेळीं, पाकिस्ताननें भारताला (हिंदुस्थानच्या फाळणीपूर्ण राष्ट्रीय कर्जाचा स्वतःचा ३०० कोटी रु. चा हिस्सा द्यावयाचें कबूल केलेलें आहे. भारताच्या मध्यवर्ती बजेटांत अजूनहि ही रक्कम येणें म्हणून दाखविली जाते. अद्याप त्यापैकी एक रुपयाहि आलेला नाहीं. पाकिस्तान स्वतःचें देणें देण्यास राजी नाहीं, परंतु हिंदी बँकांनीं भारतांतून आणखी पैसा आणून पाकिस्तानांत गुंतवावा, अशी त्या देशाची कारवाई आहे. पाकिस्तानची परदेशी हुंडणावळीची अडचण सोडविण्याचा हा मार्ग परदेशी बँकांना सोईचा नाहीं. पाकिस्तानांतील विदेशी एक्सचेंज बँका व त्यांचे देश मातबर असल्यामुळें, त्या कांहीं सवलती मिळवूं शकल्या आहेत; हिंदी बँकांची मात्र कुचंबणा वाढत आहे. पाकिस्तानांत पैसे पाठविण्यास बँकांना परदेशी हुंडणावळ उपलब्ध करून देण्यास रिझर्व्ह बँक मुळीच तयार नाहीं.

पाकिस्तान सरकारनें परिस्थितीची दखल घेऊन ऑर्डिनन्सच्या अटींतून हिंदी बँकांची मुक्तता केली नाहीं, तर हिंदी बँकांना तेथील शाखा बंद करण्याखेरीज गत्यंतर उरणार नाहीं. ब्रह्मदेशांतील शाखा गेल्या वर्षी गमावल्या आहेतच, त्यांत आतां ह्या शाखांची भर पडेल. त्यामुळें फारसें बिघडेल, असें मात्र नाहीं. कारण, हिंदी बँकांचे पाकिस्तानांतील व्यवहार कमी कमी होत चालले आहेत. हिंदी बँकांनीं जाणीवपूर्वक त्या शाखा उघडलेल्या नसून, फाळणीपूर्वीच्या शाखांचा तो वारसा आहे. पाकिस्तानलाच जर हिंदी बँका त्या देशांत नकोशा झाल्या असतील तर नामुष्कीनें तेथें राहण्यांत कांहींच अर्थ नाहीं. हिंदी बँकांच्या परदेशांतील शाखांपैकी निम्म्या शाखा बंद होण्याचा हा मानहानीचा प्रसंग आहे.

## डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट्स् असोसिएशनचें यशस्वी अधिवेशन

दि डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट्स् असोसिएशनचें २० वें अधिवेशन जूनच्या पहिल्या आठवड्यांत उगार शुगर वर्क्स लि. च्या पाहुणचारांत यशस्वी रीतीनें पार पडलें. प्रतिनिधि आणि पाहुणे म्हणून सुमारें ४५० हितसंबंधीं अधिवेशनास उपस्थित होते. त्यांत दोघे भूतपूर्व अध्यक्षहि होते. (फलटण शुगर वर्क्स लि. चे श्री. के. जी. आपटे आणि कोल्हापूर शुगर मिल्स लि. चे श्री. एम. बी. लोहिया). खासगी आणि सहकारी, दोन्ही प्रकारच्या कारखान्यांनीं संशोधनाच्या कामीं एकत्र यावें आणि पुणें येथें स्थापन करण्यांत येत असलेल्या संशोधन केंद्रास मनःपूर्वक पाठिंबा द्यावा, असें मावळते अध्यक्ष, श्री. नारायणदास जा. रूपारेल ह्यांनीं आवाहन केलें. तंत्रज्ञांनीं एकूण ३१ निबंध सादर केले. कोल्हापूर शुगर मिल्स लि.च्या "जीवन कल्याण"नें करमणुकीसाठी देवलकृत संगीत मृच्छकटिकाचा प्रयोग सादर केला. येत्या वर्षाचे अध्यक्ष, श्री. जयवंतराव भोसले (श्रीकृष्णा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन) ह्यांनीं प्रसंगोचित भाषण केलें.

## कलकत्त्यांत बीभत्स चित्रपटांचे अड्डे

कलकत्ता शहरांत लैंगिक विषयांचे बीभत्स चित्रपट दाखविणारे अनेक अड्डे आहेत, अशी पोलीसांची माहिती आहे. ह्या चित्रपटांचे प्रेक्षक बहुधा धंद्यांत व व्यापारांत अमाप पैसे कमावलेल्या धनिकांचे पुत्र अगर नातलग असतात. प्रेक्षकांत तरुण स्त्रियाहि असतात. चित्रपट दाखविणारे धंदेवाईक अगर हौशी लोकहि चांगले गबर असतात. त्यांच्यांजवळ चित्रपट दाखविण्याचें सर्व साहित्य तयार असतें. परंतु हे अड्डे उघडकीस आणण्याचें काम मात्र फार बिकट आहे. अड्डे चालविणाऱ्यांची संघटना अगदीं चिरेबंदी असते. एखाद्या माणसाच्या विश्वासूपणाची त्यांना खात्री नसेल तर तो एखाद्या संस्थानचा महाराजा असला तरी त्याला चित्रपट दाखविण्याच्या जागेपासून कटाक्षानें दूर ठेवण्यांत येतें. शिवाय चित्रपट दाखविणाऱ्या लोकांचे समाजांतील प्रतिष्ठित लोकांशीं चांगले लागेबांधे असतात. त्यामुळेंहि अड्डे उघडकीस आणणें अतिशय कठीण जाते.

## कॅनडांतील हिंदी नागरिकांची वाढती संख्या

कॅनडाच्या १९६१ सालच्या शिरगणतीप्रमाणें तेथील हिंदी नागरिकांची संख्या ६,७७४ पर्यंत वाढली आहे. त्यापूर्वीच्या शिरगणतींत २,१४८ नागरिकांची नोंद करण्यांत आली होती. ह्यांपैकी बहुतेक नागरिकांनीं कॅनडांत आपला चांगला जम बसविला आहे. १९६२ सालीं कॅनडानें परदेशांतून येणाऱ्या नागरिकांबद्दल जो कायदा केला आहे त्याप्रमाणें कोणाहि परदेशियाला कॅनडांत स्थायिक होता येतें. मात्र त्याचा कॅनडाला उपयोग असला पाहिजे. शिवाय, भारत आणि कॅनडा ह्यांच्यांतील कराराप्रमाणें दरसाल ३०० हिंदी नागरिकांना कॅनडांत प्रवेश दिला जातो. १९६४ सालीं ११५४ हिंदी नागरिकांनीं कॅनडाचें राष्ट्रीयत्व मिळण्यासाठी अर्ज केले होते. तें मंजूर करण्यांत आले. आणखीहि असे अर्ज येत आहेत. त्यामुळें कौशल्याचीं कामें करणाऱ्या हिंदी नागरिकांना भारत मुकत आहे.

## अधिकाऱ्यांचा पगार त्यांच्या बँकखात्यांत जमा

गॅझेटेड अधिकाऱ्यांचा पगार देण्याची नवी पद्धत म्हैसूर राज्य सुरू करीत आहे. सचिवालय आणि व्यापारी करखातें येथून त्यास प्रारंभ होईल. ह्या अधिकाऱ्यांच्या बँकेंतील खात्यांत परस्पर त्यांच्या पगाराची रक्कम दाखल केली जाईल. एक वर्षभर अनुभव घेतल्यावर त्या पद्धतीचें भवितव्य ठरविलें जाईल.

**परदेशीय चलनाचा तुटवडा : कर्जफेडीचा वाढता बोजा**

हिंदच्या परदेशीय चलनाच्या सांठ्यांत खडखडाट ऐकूं येऊं लागल्यानें भारत सरकारला आयातीवर कडक निर्बंध घालावे लागले. परदेशीय चलनाच्या टंचाईची ही झळ चौथ्या कार्यक्रमालाहि लागणार आहे. जागतिक बँकेच्या प्रतिनिधींचें एक मंडळ सध्यां भारतांत आलें असून तें ह्यासंबंधीं सरकारशीं चर्चा करीत आहे. भारताची नियोजन समितीहि ह्या चर्चेत भाग घेत आहे. चवथ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी लागणाऱ्या परदेशीय चलनाची माहिती समितीनें प्रतिनिधि मंडळाला दिली. समितीनें दिलेल्या माहितीप्रमाणें, कार्यक्रमासाठी भारताला परदेशीय चलनाच्या रूपांत ४,००० कोटी रुपयांचा तुटवडा जाणवणार आहे. ह्यापैकी २,६०० कोटी रुपयांचें परदेशीय चलन कार्यक्रमासाठी लागणाऱ्या आयातीसाठी जरूर आहे आणि १,४०० कोटी रुपयांचें चलन मागील कर्जांची व त्यावरील व्याजाची फेड करण्यासाठी लागणार आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचा जो आराखडा तयार करण्यांत आला होता, त्यापेक्षा वरील रक्कम बरीच मोठी आहे. आराखड्यांत परदेशीय चलनाच्या टंचाईचा अंदाज ३,२०० कोटी रुपयांचा होता. त्यापैकी २,१०० कोटी रुपयांचें चलन कार्यक्रमांतील खर्चासाठी लागणार होतें व १,१०० कोटी रुपयांचें चलन कर्जाच्या व त्यावरील व्याजाच्या परतफेडीसाठी लागणार होतें. अशा रीतीनें दोन्ही बाबींसाठी लागणाऱ्या परदेशीय चलनाचा अंदाज बराच फुगत चालला आहे. परदेशीय चलनाच्या टंचाईमुळें भारत आधींच अडचणींत सांपडला असतांनाच ४ थ्या कार्यक्रमासाठी लागणाऱ्या परदेशीय चलनाचा तुटवडा पडणार असें दिसत आहे.

---

**मोहेंनजोदारो येथील सांस्कृतिक अवशेषांचें जतन**

सिंधू नदीच्या खोऱ्यांत कराचीच्या उत्तरेला सुमारें ४०० मैलांवर मोहेंनजोदारो येथें आर्यांच्या पूर्वीच्या संस्कृतीचे अवशेष सांपडलेले आहेत. ही संस्कृति ५ हजार वर्षांपूर्वीची असावी असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. ह्याच संस्कृतीचीं कांहीं केंद्रें भारतांतहि सांपडलेलीं आहेत. भरतखंडांतील मानवी इतिहासावर नवा प्रकाश टाकणारे प्राचीन अवशेष म्हणून मोहेंजोदारोला महत्त्व प्राप्त झालेलें आहे. पण, ह्या अवशेषांना नैसर्गिक कारणांनीं धोका पोंचलेला आहे. सिंधू नदीचें पात्र उथळ होत चालल्यानें खोऱ्यांतील भूमिगत पाण्याची पातळी वाढत चाललेली आहे. त्यामुळें जमिनीची धूपहि वाढत चाललेली आहे. हा धोका केवळ प्राचीन अवशेषांनाच आहे असें नाहीं. भूमिगत पाण्यांतील क्षारामुळें पाकिस्तानमधील हुकमी पाणीपुरवठा असणारी जमीन घटत चालली आहे. जमिनीखालील पाण्याची पातळी वर येत चालल्यामुळें पाकिस्तानला दरसाल एक लाख एकर पिकाऊ जमीन गमवावी लागत आहे. मोहेंनजोदारो येथील अवशेषांचें जतन करण्यासाठी काय उपाय योजावे हें सुचविण्यासाठी पाकिस्तान सरकारनें संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सांस्कृतिक उपसंघटनेकडून तीन तज्ज्ञ मागविले होते. भूमिगत पाण्याचा निचरा करण्यासाठी पाणी उपसून काढणें अगर वर काढणें असे, उपाय बहुधा सुचविण्यांत येतात. पण हे दोन्ही उपाय अर्थातच खर्चाचे आहेत. शिवाय ते योजण्याच्या आधीं कांहीं तांत्रिक अडचणींचें निवारण करावें लागणार आहे. मोहेंनजोदारो येथील अवशेष भूमिगत पाण्यामुळें कोसळण्याचा संभव आहे. इजिप्तमधील प्राचीन अवशेष जतन करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेनें चांगली कामगिरी केलेली आहे. मोहेंनजोदारो येथील प्राचीन शहरांच्या अवशेषांचें जतनहि ह्या संघटनेनें हातीं घेतलें पाहिजे.

**कागदाचा कारखाना**—पंजाबमधील नांगलजवळ राज्य सरकारनें वृत्तपत्रांना लागणाऱ्या कागदाचा कारखाना काढण्यासाठी मंजुरी दिली आहे. कारखाना खाजगी मालकीच्या विभागांत निघणार आहे. त्याच्या उभारणीसाठी १३ कोटी रुपये भांडवल लागणार आहे. त्यांपैकी कांहीं भांडवल सरकारी मालकीचें असेल. कारखान्यांत रोज २०० टन कागद निर्माण करण्यांत येईल व त्यांत १० हजार लोकांना रोजगार मिळेल. १९६७ सालीं तो चालू होण्याची शक्यता आहे.

**इथिओपिआंतील लोकरीच्या कापडाची गिरणी**—इथिओपिआंतील पहिली लोकरीच्या कापडाची गिरणी आदिस-अबाबा येथें काढण्यांत येणार आहे. ती उभारण्याच्या कामीं एका हिंदी कारखान्याचें साह्य घेण्यांत येणार आहे. हिंदी कंपनी एकूण भांडवलापैकी ५० टक्के भांडवल गुंतविणार आहे. कारखान्याची यंत्रसामग्री व इतर साधनें ह्यांची जबाबदारी हिंदी कंपनीवर आहे. ह्या साहित्याची किंमत सुमारें ८·५ लाख रुपये होईल.

**तांत्रिक कॉलेजाची स्थापना**—सुप्रसिद्ध हिंदी स्थापत्य-विशारद कै. एम. विश्वेश्वरअय्या ह्यांच्या सन्मानार्थ तांत्रिक शिक्षण देणारें एक आदर्श कॉलेज काढण्याचें म्हैसूरच्या सरकारनें ठरविलें आहे. संस्थेच्या स्थापनेसाठी ५ कोटी रुपये खर्च येईल. म्हैसूर राज्यांतील जोग धबधब्याच्या परिसरांत प्रवाशांना आकर्षण करण्यासारखें एक विश्रांतिकेंद्रहि उभारण्यांत येणार आहे, ह्या कामाची योजना तयार करण्यांत आली आहे. तीसाठी सुमारें ४५ लाख रुपये खर्च येईल, असा अंदाज आहे. परदेशीय प्रवाशांची सोय करण्याच्या दृष्टीनें धबधब्याच्या आसमंतांत विमानें उतरण्यासाठी एक धसरपट्टीहि बांधण्यांत येणार आहे.

**चंद्रावर प्रयोगशाळेचा संकल्प**—अंतरिक्षांतील प्रवासासंबंधींच्या एका अमेरिकन तज्ज्ञानें असें जाहीर केलें आहे कीं, चंद्रावर एक आंतरराष्ट्रीय प्रयोगशाळा स्थापन करण्याची तयारी करण्यांत येत आहे. १० ते २० वर्षांच्या अवधींत हें शक्य होईल असा अंदाज आहे. प्रयोगशाळेच्या कमिटींत अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, रशिया, बेल्जम आणि बल्गेरिया ह्या देशांचे शास्त्रज्ञ आहेत. अंतरिक्ष भ्रमणाच्या अलीकडील प्रगतीपूर्वीं अशी प्रयोगशाळा स्थापण्यास ५० ते १०० वर्षें लागतील असा अंदाज होता.

**जड पाण्याची निर्यात**—अणुशक्तीच्या उत्पादनासाठी लागणाऱ्या १० टन वजनाच्या जड पाण्याची बेल्जममधील अणुभट्टीसाठी निर्यात करण्यांत आली आहे. नांगल येथें उभारण्यांत आलेल्या कारखान्यांत त्याची निर्मिति करण्यांत आली. भारत व बेल्जम ह्या देशांत अणुशक्तीचा शांततामय कामासाठी उपयोग करण्यासंबंधीं करार झालेला आहे. त्याप्रमाणें हें पाणी बेल्जमला भाड्यानें देण्यांत आलें आहे.

**काश्मीरमध्यें किरणदूषित पाऊस**—काश्मीरमध्यें अलीकडे पडलेल्या पावसाच्या पाण्यांत अणुस्फोटामुळें हवेंत पसरलेले दूषित कण सांपडले अशी माहिती भारताच्या अणुशक्ति मंडळानें जाहीर केली आहे. चीननें सिंकिॲंगमध्यें कोठेंतरी अणुबॉंबचा स्फोट केल्यावर काश्मीरमध्यें दूषित कणांचा आढळ होईल अशी अपेक्षा होतीच. हवामानखात्यांतील तज्ज्ञांची एक तुकडी काश्मीरमधील पावसाच्या पाण्याचे नमुने आणण्यासाठी तिकडे गेली होती. त्यांनीं आणलेल्या पाण्याची तपासणी करण्यांत आल्यावर वरील अपेक्षा खरी ठरली आहे.

## घड्याळें तयार करण्याचे नवीन कारखाने

घड्याळे तयार करण्याचे आणखी कारखाने काढण्यासंबंधीं भारत सरकारचें उद्योगखातें स्विटझरलंडमधील कारखानदारांशीं आणि रशिआशीं प्राथमिक स्वरूपाचीं बोलणीं करीत आहे. दोन्ही देशांकडून ह्यासंबंधीं येणाऱ्या योजनांत मुख्य प्रश्न परदेशीय हुंडणावळींतील खर्चाचा राहील. भारतांत घड्याळांचा नवीन कारखाना काढावयाचा झाल्यास नव्या कारखान्याला घड्याळांतील सुट्या भागांची परदेशांतून आयात करण्याची गरज फार काळ लागतां कामा नये, अशी सरकारची भूमिका आहे; किंवा परदेशाच्या मदतीनें करण्यांत आलेलीं घड्याळें निर्यात करून त्यांच्यापासून आयात केलेल्या सुट्या भागांपुरतें परदेशीय चलन तरी मिळालें पाहिजे. स्विटझरलंडमधील घड्याळांचे कारखानदार आतांपर्यंत आपलें तांत्रिक ज्ञान भारताला देण्यास तयार नव्हते. परंतु आतां त्यांनीं तशी तयारी दाखविली असून बंगलोरमधील हिंदुस्तान मशीन टूल्सनें तयार केलेल्या घड्याळांशीं स्पर्धा करणार नाहींत अशा प्रकारचीं घड्याळें बनविण्याचीहि तयारी दर्शविली आहे. बंगलोर येथील कारखान्यांत जपानच्या साह्यानें घड्याळें बनविण्यांत येत असतात. शिवाय, स्विटझरलंडच्या मदतीनें करण्यांत येणारीं घड्याळें किंमतीनें अधिक असतील. अशा प्रकारच्या किंमती घड्याळांची मागणी भारतांत बरीच आहे. स्विटझरलंडच्या मदतीनें घड्याळांशिवाय रसायनें, औषधें, यांत्रिक हत्यारें, इत्यादि वस्तु तयार करण्याचे कारखाने भारतांत काढण्यासंबंधींहि विचार करण्यांत येत आहे. हा माल तयार करून तो परत स्विटझरलंडलाच निर्यात करतां येईल काय, तें अजमावून पाहाण्यांत येत आहे. संकल्पित कारखान्यांतील सर्व भांडवल परदेशी असावें, कीं त्यांतील कांहीं भाग सरकारचा असावा ह्यावरहि विचार चालू आहे. परदेशांत खपणारा माल भारतांत तयार करून परदेशीय चलन मिळविण्याचा एक मार्ग म्हणूनच ह्या प्रश्नाकडे पहाण्यांत येत आहे.

---

## स्टेट बँकेचा आगामी कार्यक्रम

पूर्वीच्या इंपिरिअल बँक ऑफ इंडियाचे स्टेट बँक इंडियामध्यें रूपांतर झालें, त्याला १ जुलै रोजीं १० वर्षें पुरीं झालीं. ह्या निमित्त, बँकेचे चेअरमन, श्री. देहेजिया, ह्यांनीं पत्रकारांना बोलावून बँकेच्या आगामी उद्दिष्टांची माहिती दिली. ग्रामीण भागांत, एकच कर्मचारी असणाऱ्या शाखा उघडण्याचा बँकेचा संकल्प आहे. प्रयोगादाखल अशा सात शाखा लवकरच सुरू केल्या जातील. बचतीला उत्तेजन देणारा एक कार्यक्रमहि बँकेनें आखला आहे. विशिष्ट क्षेत्रांत बँकेंत खातें उघडणाराला छोटेंसें बक्षीस देण्याची कल्पना त्यांत अंतर्भूत आहे. मोठ्या शहरांतील कचेऱ्यांतून टेलर पद्धति सुरू केली जाईल. त्यामुळें चेकचे पैसे मिळण्यास वेळ लागणार नाहीं.

---

## गाडी लेट झाल्यास नातेवाईकांना निरोप

हौरा, मद्रास आणि मुंबई येथून दिल्लीला जाणाऱ्या, वरच्या वर्गाच्या रेल्वे प्रवाशांच्यासाठी एक नवी सोय करण्यांत आली आहे. त्यांची गाडी लेट झाल्यास, ते दिल्लीमधील तसें आपल्या मित्रांना आणि नातेवाईकांना आगाऊ कळवूं शकतील. हा निरोप रेल्वेचा नोकरवर्ग टेलिफोन करून कळवितील. अलिगड, आग्रा आणि मथुरा येथें गाडीचा कंडक्टर गार्ड हे निरोप जमा करतील. नॉर्दर्न रेल्वेची ही योजना तूर्त प्रयोगादाखल आहे.

---

## हायकोर्टांतून तुंबलेलें काम

कोर्टकज्जांतील कामांत न्याय मिळण्यास उशीर झाला म्हणजे तो न मिळाल्यासारखाच होतो, असें म्हणतात. भारतामधील हायकोर्टांतून निकाल न लागलेल्या दाव्यांची व खटल्यांची संख्या वाढतच चालली आहे. कोठल्याहि दिवाणी दाव्याचा निकाल २ वर्षांपेक्षा अधिक काळ लांबणीवर पडू नये आणि फौजदारी खटल्याचा निकाल सहा महिन्यांपेक्षा अधिक लांबणीवर पडू नये, अशी सूचना हायकोर्टांना देण्यांत आलेली आहे. हायकोर्टांतील न्यायाधिशांची संख्या गेल्या दोन वर्षांत १६३ वरून १७३ पर्यंत वाढविण्यांत आली आहे. शिवाय जादा न्यायाधिशांच्या जागा निर्माण करण्यांत येऊन हायकोर्टांचे कामाचे दिवस वाढवून दरवर्षी २१० करण्यांत आले आहेत, तरी हायकोर्टांतून तुंबलेल्या प्रकरणांत दरसाल २० हजार नव्या प्रकरणांची भर पडत आहे. ८८ हजार प्रकरणांचे निकाल दोन वर्षांनंतरहि अजून लागलेले नाहींत.

---

## गिर्यारोहण करतांना लागणारें अन्न

पर्वतावरील उंच शिखरावर आरोहण करणाऱ्या पर्वतपटूंना अनेक गोष्टींची काळजी घ्यावी लागते. त्यांत अन्नपुरवठ्याचा प्रश्न महत्त्वाचा असतो. हें अन्न रुचकर तर असावेंच लागतें पण त्याची पोषणक्षमताहि महत्त्वाची असते. शिवाय तें वजनांत हलकें आणि त्याची पुडकीं कमींतकमी आकाराची असावी लागतात. हिंदी गिर्यारोहण पटूंना शिखर सर करण्याचा विक्रम केला त्या वेळीं त्यांनीं मुख्यतः हिंदी पद्धतीचाच आहार घेतला. फार उंचीवर अन्नाचे घनपदार्थ घेऊं नयेत असें एक मत आहे. पण हिंदी तुकडीच्या नेत्याला तें मान्य नाहीं. घनपदार्थांतील चरबी काढून टाकली तर बाकीचे अन्नपदार्थ घेण्यास कांहीं हरकत नाहीं. असें त्यांचें म्हणणें आहे.

---

## मॅनेजिंग एजन्सी पद्धत रद्द करण्यास विरोध

फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीनें भरविलेल्या चर्चासत्रांत प्रत्येकच वक्त्यानें मॅनेजिंग एजन्सी पद्धत बंद करण्याच्या सरकारी योजनेचा धिक्कार केला. ह्या पद्धतीमध्यें दुरुपयोगाला जागा आहे आणि त्यांत सत्तेचें केंद्रीकरण होतें, म्हणून केवळ ती पद्धत बंद करणें चुकीचें आहे, असें फेडरेशनचे अध्यक्ष, श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांनीं प्रतिपादिलें. मॅनेजिंग एजन्सीच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्याचे व्यापक अधिकार सरकारला आहेत. मॅनेजिंग एजन्सीची पद्धत महागडी आहे, ह्या आरोपाचा श्री. किर्लोस्कर ह्यांनीं इन्कार केला. व्यवस्थापनाच्या खर्चाच्या कमाल मर्यादा आतां कायद्यानेंच घालून दिलेल्या आहेत. मॅनेजिंग डायरेक्टरची पद्धत अधिक स्वस्त होईलच असें नाहीं, पण मॅनेजिंग एजन्सीचे खास फायदे मात्र मिळणार नाहींत.

---

## अहमदाबाद येथें कोकाकोलाचा कारखाना

मेसर्स प्युअर बीव्हरेजेस प्रा. लि. अहमदाबाद येथें कोकाकोलाच्या बाटल्या भरण्याचा कारखाना उभारीत आहे. प्रत्येक मिनिटास ३,००० बाटल्या भरून तयार होतील. कारखान्याला २५ लक्ष रुपये भांडवली खर्च येईल. कारखान्याच्या इमारतीचा पायाचा दगड बसविण्याचा समारंभ नुकताच झाला. अमेरिकेकडून मागविलेली यंत्रसामग्री ऑगस्ट अखेर येऊं लागेल आणि मार्च, १९६६ मध्यें कारखान्याचें काम सुरू होईल.

### धान्याचा शिलकी सांठा उभारण्यांत अडचणी

अन्नधान्यांच्या भडकत्या किंमतींना आळा घालण्यासाठी गहू आणि तांदूळ ह्यांचा शिलकी सांठा उभारण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलेलें आहे. हा साठा मुख्यतः परदेशांतून आयात करण्यांत येणाऱ्या धान्यांतून करण्यांत यावयाचा होता. ४० लाख टन गहू आणि २० लाख टन तांदूळ सांठविण्याचा सरकारचा इरादा आहे. परंतु हें लक्ष्य गांठणें कठीण जाणार अशीं लक्षणें दिसत आहेत. राज्य सरकारांकडून आयात केलेल्या धान्याच्या मागण्या कमी होण्याऐवजीं वाढतच चाललेल्या आहेत. बिहार, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, गुजरात आणि केरळ ह्या राज्यांना गेल्या वर्षी जितकें अन्नधान्य पुरविण्यांत आलें, त्याहीपेक्षा अधिक धान्याच्या मागण्या त्यांच्याकडून येत आहेत. मे महिन्यानंतर दरमहा २ लाख टन गव्हाचा साठा करण्याचा सरकारचा विचार होता. पावसाळ्यांत राज्यांकडून येणाऱ्या मागण्या भागवून पुढच्या जानेवारीपर्यंत १० लाख टन गहू साठविता येईल असा अंदाज करण्यांत आला होता. त्याचप्रमाणें चालू वर्षअखेर ७ लाख टन तांदुळाचा साठा करता येईल, अशी अपेक्षा होती. पण हा अंदाज फसलेला आहे. चालू वर्षाच्या पहिल्या सहामाहींत मध्यवर्ती सरकारला राज्य-सरकारांना दरमहा ६,५०,००० टन गहू पुरवावा लागला आहे. म्हणजे गेल्या वर्षाच्या मानानें पुरवठ्याची जबाबदारी कमी झालेली नाहीं. आयात केलेल्या व देशांतच जमा केलेल्या अन्नधान्याच्या मागण्या मध्यवर्ती सरकारकडे अशाच येत राहिल्या तर चालू वर्षअखेर शिलकी साठा उभारण्याचा सरकारचा हेतु सफल होणें कठीणच आहे. अन्नधान्याचा शिलकी साठा उभारणें हा अन्नाबाबतच्या धोरणाचा फार महत्त्वाचा भाग आहे. धान्याची विभागीय क्षेत्र, किमतीवरील नियंत्रणें, वाटप इत्यादि उपाय ह्या धोरणाशीं निगडित झालेले आहेत. मुख्य धोरण अमलांत आणण्यांत जर अपयश आलें तर असल्या तात्पुरत्या उपायांनीं अन्नधान्याच्या टंचाईच्या परिस्थितींत सुधारणा होण्यासारखी नाहीं.

---

### आस्वान येथील धरणाचें बांधकाम

इजिप्तमध्यें नाइल नदीवर बांधण्यांत येणाऱ्या आस्वान येथील धरणाचें बांधकाम अपेक्षेपेक्षां लवकर पुरें होण्याची शक्यता आहे. १९६७ अखेर धरणाच्या बंधाऱ्याचें मुख्य काम पुरें होईल. तसें झाल्यास हें काम ठरलेल्या वेळापत्रकापेक्षा एक वर्ष आधींच पूर्ण झालें असें म्हणतां येईल. ह्या धरणाच्या बांधकामांत ३ वर्षांपूर्वी अडचणी निर्माण झाल्या होत्या. रशिअन आणि इजिप्शिअन तंत्रज्ञांचा योग्य तो मिलाफ न झाल्यानें काम रेंगाळलें होतें. त्या वेळीं अध्यक्ष प्रे. नासर ह्यांनीं बांधकामाच्या वरिष्ठ यंत्रणेची पुनर्घटना केली; रशिअन यंत्रसामग्रीच्या जोडीला पाश्चिमात्य देशांकडील कांहीं यंत्रसामग्री दिली व धरणावर काम करणाऱ्या कामगारांचा मुशाहिरा वाढविला. त्याचा इष्ट असा परिणाम झाला. गेल्या वर्षी धरणाचा पहिला टप्पा पुरा झाला. त्यामुळें उपलब्ध झालेल्या पाण्यानें ७ लाख एकर जमीन बारमहा भिजविण्याची सोय झाली. ह्याचा अर्थ असा कीं, ह्या जमिनींत आतां एका पिकाच्या ऐवजीं तीन पिकें घेतां येतील. धरण पूर्ण करण्याची सरकार घाई करीत आहेत, कारण, तें पुरें झाल्यावर होणाऱ्या शेतीच्या उत्पादनवाढीनें धरणासाठी आलेला खर्च दोनच वर्षांत बाहेर पडेल.

### उसाच्या चिपाडांपासून कागदाचें उत्पादन

आंध्र प्रदेशांत निझामाबादच्या आसमंताचा भाग उसाच्या लागवडीसाठी प्रसिद्ध आहे. ह्या भागांतील बोधन येथील साखर-कारखाना भारतामधील सर्वांत मोठा आहे. ऊंस गाळून झाल्यावर उरणाऱ्या चिपाडांचा उपयोग करून कागद तयार करण्याचा एक कारखाना आतां उभारण्यांत येणार आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी ११ कोटी रुपये भांडवल लागेल आणि त्यांत दररोज १०० ते १२० टन कागद निर्माण करण्यांत येईल. कागदाच्या उत्पादनास प्रारंभ होण्यास अजून २ ते २॥ वर्षांचा अवधी लागेल. ह्याच कारखान्यांत पुढें वृत्तपत्रांना लागणारा कागदहि तयार करण्यांत येणार आहे. वृत्तपत्रांना लागणारा कागद तयार करण्याचें काम अर्थातच कांहींसें अवघड आहे. तथापि, कारखान्याच्या उभारणीच्या कामीं तांत्रिक मदत देणाऱ्या परदेशीय कंपनीच्या साह्यानें तें शक्य होईल. आतांपर्यंत उसाच्या चिपाडांचा उपयोग फक्त जळण म्हणूनच करण्यांत येत असतो.

---

### मद्रास शहरांतील साखरेच्या वांटपाची पद्धत

मद्रास शहरांतील लोकांना शिधाकार्डावर देण्यांत येणाऱ्या साखरेचें वांटप पगारावर ठरविण्यांत आलें आहे. त्यासाठी लोकांच्या पगारावर आधारलेले पांच गट करण्यांत आले आहेत. दरमहा १०० रुपयांपेक्षा कमी उत्पन्नवाल्यांना दरमहा २ किलो साखर; १०० ते ३०० रुपये उत्पन्न असणारांना दरमहा ५ किलो साखर; ३०० ते ५०० रुपये मासिक उत्पन्न असणारांना ७ किलो साखर; ५०० ते १,००० रुपये मासिक उत्पन्न असणारांना १० किलो साखर, आणि दरमहा १,००० रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्यांना दरमहा १५ किलो साखर मिळणार आहे. ज्या कुटुंबांत पांचपेक्षा अधिक माणसें नाहींत त्यांना ही योजना लागू करण्यांत येईल.

---

### ३० कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत

भारताचा परदेशीय चलनाचा सांठा खालावल्यामुळें उत्पन्न झालेल्या परिस्थितींत आयातीवर अतिशय कडक निर्बंध घालण्यांत आले आहेत. ह्यासंबंधीं बोलतांना इंडिअन ऑईल कंपनीचा एक प्रवक्ता म्हणाला कीं ह्या आणीबाणीच्या परिस्थितींत रशियानें रुपयाच्या चलनाच्या मोबदल्यांत तेल व तेलजन्य पदार्थ देण्याचें कबूल करून भारताची फार मोठी सोय केली आहे. त्यामुळें परदेशीय चलनावरील ताण कमी होण्यास खूप मदत होईल. रशियाच्या योग्य वेळीं करण्यांत आलेल्या मदतीमुळें भारताचें ३० कोटी रुपयांचें परदेशीय चलन वाचेल.

---

### पश्चिम बंगालमध्यें सुताच्या नव्या गिरण्या

पश्चिम बंगाल सरकारनें चालू पंचवार्षिक कार्यक्रमांत सुताच्या पांच नवीन गिरण्या खाजगी मालकीच्या विभागांत काढण्याचें ठरविलें आहे. त्यांच्या भांडवलांत सरकार सहभागी होणार आहे. राज्य सरकार एकूण ६५ लाख रुपयांचें भांडवल गुंतविणार असून गिरण्यांच्या संचालक मंडळांवर आपले पुरेसे डायरेक्टर्स ठेवणार आहे. बंगालमधील कापडाच्या गिरण्यांना जेवढें सूत लागतें, त्याच्या २५ टक्केच उत्पादन राज्यांत होतें असा अंदाज आहे. संकल्पित नव्या गिरण्यांत ७५,००० चात्या बसविण्यांत येणार आहेत. नव्या गिरण्या चालू झाल्या म्हणजे सुताची बरीच तूट भरून येईल अशी अपेक्षा आहे.

## सहकारी सोसायटी व तिचे नोकर
### औद्योगिक तंट्यांबाबत अधिकार फक्त इंडस्ट्रिअल कोर्टानाच

"महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह सोसायटीज् ॲक्टचें ९१ वें कलम कांहींहि सांगो, सहकारी सोसायटी आणि तिचे नोकर ह्यांच्यामधील तंट्यांचा निवाडा करण्याचा अधिकार फक्त इंडस्ट्रिअल कोर्टानाच आहे; सहकारी सोसायट्यांच्या रजिस्ट्रारला औद्योगिक तंट्यांच्या बाबतींत कांहींहि अधिकार नाहीं", असें मुंबई हायकोर्टाच्या फुल बेंचानें जाहीर केलें आहे.

चांदा जिल्ह्यांतील विणकर सहकारी सोसायटीनें कामावरून काढून टाकलेल्या श्री. रामभाऊ ह्यांच्या रिट् पेटिशनवरून हायकोर्टानें हा निवाडा सांगितला:

सोसायटीचा व्यवसाय किंवा कारभार ह्यासंबंधीं कोणताहि तंटा उपस्थित झाल्यास तंटा रजिस्ट्रारकडे निवाड्यासाठी पाठविला पाहिजे, असें ९१ वें कलम सांगतें. 'कोणताहि' ह्या शब्दाच्या व्याप्तींत औद्योगिक तंटे येत नाहींत, असें हायकोर्टास आढळून आलें. काढून टाकलेल्या नोकराला पुन: कामावर घेण्यास लावण्याचा किंवा नवीं बंधनें लादण्याचा रजिस्ट्रारला अधिकार नाहीं. नोकरीच्या अटींतहि त्याला फेरफार करतां येत नाहीं. औद्योगिक तंट्यांच्या बाबतींत निर्णायक अधिकार फक्त इंडस्ट्रिअल कोर्टानाच आहे.

## हिंदुस्तान स्पिनिंग आणि इंडियन मॅन्युफॅक्चरिंग ह्यांचें डिव्हिडंड

हिंदुस्तान स्पिनिंग ॲंड वीव्हिंग मिल्स कं. लि. आपल्या इक्विटि शेअरवर ठोक रु. ४५ डिव्हिडंड देणार आहे. पूर्ण भरणा झालेल्या प्रेफरन्स शेअरला रु. ७० आणि अंशत: भरणा झालेल्या शेअरला रु. १७·५० डिव्हिडंड मिळेल. इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कं. लि. नें शेअरवर रु. ४५ ( ठोक ) डिव्हिडंड जाहीर केलें आहे. पूर्ण भरणा झालेल्या प्रेफरन्स शेअरला ठोक रु. ७० आणि अंशत: भरणा झालेल्या शेअरला रु. ३५ ह्या दरानें डिव्हिडंड मिळेल. ह्या दोन्ही कंपन्या ठाकरसी समूहांतील आहेत.

## पाकिस्तानची तिसरी पंचवार्षिक योजना

पाकिस्तानच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेला १ जुलै रोजीं प्रारंभ झाला. ही योजना ५,२०० कोटी रु. खर्चाची आहे; दुसरी पंचवार्षिक योजना २,५०० कोटी रु. ची होती. राष्ट्रीय उत्पन्न ३७% नें वाढविण्याचा आणि ५५ लक्ष लोकांना रोजगार मिळवून देण्याचा ह्या योजनेचा हेतु आहे.

## सहकारी साखर कारखान्याचें उत्पादन

१९६४–६५ अखेरच्या मोसमांत सहकारी साखर कारखान्यांचें उत्पादन ७·५ लक्ष मेट्रिक टन होईल. साखरेच्या एकूण उत्पादनाच्या २५% इतकें तें भरेल. १९६३–६४ मध्यें तें २२·३०% होतें.

## किर्लोस्कर न्यूमॅटिक कं. नें डिव्हिडंड वाढविलें

किर्लोस्कर न्यूमॅटिक कं. लि. नें आपलें डिव्हिडंड ठोक रु. १२·५ चे ठोक रु. १५ केलें आहे. कंपनी २५ लक्ष रु. नीं आपलें भांडवल वाढविणार आहे. विद्यमान भागधारकांना प्रत्येक दोन शेअर्सला एक नवा शेअर मिळूं शकेल.


सरदारगृह

मुंबईंत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमचीं वैशिष्ट्यें —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. :–३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.


| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. | १० लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. | १५ ,, |
| ठेवी | ... | रु. | ३१८ ,, |
| खेळतें भांडवल | ... | रु. | ४५३ ,, |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.



स्थापना १९१८

महाराष्ट्र सरकारनें तगाईवर मंजूर केलेले "विजय" नांगर वापरा. ४, ६ व ८ बैली फाळ व सुटे भाग



तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्



१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें